# प्रकरण ३ भारत आणि आशिया

आधीच्या प्रकरणात भारताचे पाकिस्तान व चीनशी असलेले संबंध आपण अभ्यासले. दक्षिण आशियातील आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये पाकिस्तानचे वर्णन 'भागीदार' आणि 'वाटाघाटी करणारा' (बार्गेनर) देश असे केले जाते. याचे कारण दक्षिण आशियावर प्रभाव टाकू शकेल इतके पाकिस्तानचे सामर्थ्य नाही; मात्र त्याला लहान म्हणूनही गणता येत नाही. या प्रकरणात आपण दक्षिण आशियातील इतर लहान देशांशी भारताचे असलेले संबंध अभ्यासणार आहोत. त्यात अफगाणिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका आणि मालदीव यांचा समावेश होतो. प्रादेशिक सत्तासमतोल किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये मोठ्या सत्तेला उपद्रव निर्माण करू शकणारे देश म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

या देशांच्या पलीकडे आपण भारताचा विस्तारित शेजार पाहिला तर त्यात पश्चिम आणि पूर्व आशियातील देशांचा समावेश होतो. पश्चिम आशियासंदर्भात भारताच्या सुरक्षा धोरणाकडे पाहिल्यास लक्षात येते की, भारताचे पॅलेस्टाईनशी संबंध आहेत, तसेच गेल्या काही वर्षांत इस्रायलशीही घनिष्ट सामरिक संबंध निर्माण झाले आहेत. भारताचे इराणसमवेत चांगले संबंध आहेत आणि एकूणच अरब जगताशी सतत संवाद सुरू असतो. खनिज तेल हा या सर्व संबंधांमधला एक महत्त्वाचा घटक आहे. पूर्व आशियाच्या संदर्भात विचार करता, भारत आसियानचा (रिजनल फोरम) आणि बिमस्टेकचाही (BIMSTEC) सदस्य आहे. भारताने व्हिएतनामशी चांगले संरक्षण संबंध प्रस्थापित केले आहेत, तसेच जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांशीही सुरक्षा संबंध विकसित करण्यावर भारताने लक्ष केंद्रित केले आहे.

या देशांसमवेत भारताच्या असलेल्या संबंधांवर आपण आता नजर टाकूया.




दक्षिण आशिया

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

स्वातंत्र्यापूर्वी आशियातील इतर देशांकडे ब्रिटिश जसे पाहत होते, त्याचा परिणाम भारताच्या या देशांशी संबंधांवर स्वातंत्र्यानंतरही झाला. ब्रिटिशांचे सुरक्षा धोरण त्यांना त्यांच्या दृष्टीने भारतातील त्यांच्या राजवटीला असलेल्या धोक्यांच्या आकलनावर अवलंबून होते. उदाहरणार्थ, त्यांना वायव्य सरहद्दीवर झारच्या नियंत्रणाखाली असलेल्या रशियाची व नंतर सोव्हिएत रशियाची भीती वाटत असे. उत्तरेकडून चीन आणि पूर्वेकडे फ्रेंचांच्या ताब्यात असलेल्या वसाहतींकडून आक्रमणाचा धोका त्यांना वाटत असे. त्यावर मात करण्यासाठी ब्रिटिशांनी 'विस्तारित सरहद्द' (एक्स्टेंडेड फ्रंटियर) अशी संकल्पना विकसित केली.

विस्तारित सरहद्द म्हणजे काय? या धोरणाचा अर्थ प्रत्यक्ष सीमेला असलेला धोका त्यापासून होता होईल तेवढा दूर ठेवायचा. त्यानुसार ब्रिटिशकालीन भारताची वायव्य सरहद्द इराण-अफगाणिस्तानची सीमा होती. ब्रिटिशांनी भारत आणि अफगाणिस्तानदरम्यानची सीमा निश्चित केली. तिला 'ड्युरंड सीमारेषा' असे म्हणतात. त्यामुळे अफगाणिस्तान हे ब्रिटिशांच्या दृष्टीने भारत आणि रशियादरम्यानचे मध्यगत राज्य (बफर स्टेट) बनले. उत्तरेकडे ब्रिटिशांनी नेपाळ, भूतान आणि सिक्कीम यांच्याशी करार केले. तिबेटचा स्वायत्त प्रदेश हा त्यांच्या दृष्टीने भारत आणि चीनदरम्यानचा मध्यगत प्रदेशच होता. पूर्वेकडे ब्रिटिशांनी बर्मावर (म्यानमार) नियंत्रण मिळवले. थायलंड हे त्यांच्या दृष्टीने ब्रिटिश भारताचे व फ्रेंचांच्या इंडोनेशियातील साम्राज्यापासून बचावाच्या मध्यगत प्रदेश बनल्या. हिंदी महासागराचा विचार करता ब्रिटिशांनी पश्चिमेकडे सुएझ कालवा, दक्षिणेकडे मॉरिशस व केप ऑफ गुड होपचे किनारे आणि पूर्वेकडे सिंगापूर, मलाया आणि जावा प्रदेशावर आपले नियंत्रण राखले.

ब्रिटिशांच्या या प्रदेशावर असणाऱ्या नियंत्रणाचे दोन अर्थ निघत असत. पहिला म्हणजे या प्रदेशाच्या सुरक्षाविषयक गरजा सांभाळण्याची जबाबदारी ब्रिटिशांवर असे. त्यामुळे या प्रदेशावर इतर शत्रूंनी आक्रमण केल्यास किंवा त्यांच्याकडून धोका वाटल्यास ब्रिटिशांनी त्यांचे संरक्षण करणे अपेक्षित होते. दुसरी बाब म्हणजे या देशांचा भारताच्या सुरक्षेला धोका उत्पन्न होत नाही, तोवर ब्रिटिश त्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करीत नसत.

त्यामुळे भारताच्या आशियातील इतर लहान देशांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात ब्रिटिशांच्या या प्रभावाचे प्रतिबिंब आपल्याला दिसते. श्रीलंका, नेपाळ, भूतान आणि सिक्कीम या देशांकडे भारत विस्तारित सरहद्द म्हणूनच पाहत असे. त्यामुळे या देशांच्या सुरक्षेची व त्यांच्या हितसंबंधांना असलेले धोके निवारण्याची जबाबदारी भारतावर आली. मात्र, पाकिस्तानच्या (पूर्व व पश्चिम) निर्मितीमुळे अफगाणिस्तान हा भारताची विस्तारित सरहद्द बनू शकला नाही.

या पार्श्वभूमीवर आशियातील लहान देशांच्या संदर्भात भारताचे सुरक्षाविषयक धोरण आपण पाहूया.

## नेपाळ



नेपाळचे संसदभवन, काठमांडू

**तुम्हांला माहीत आहे का?**

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिमालयाच्या प्रदेशातील लहानसहान गोरखा राज्ये एकत्र येऊन नेपाळमध्ये त्यांची राजेशाही प्रस्थापित झाली. ब्रिटिश आणि नेपाळ दरम्यान १८१४-१६ मध्ये युद्ध झाले. त्यानंतर झालेल्या तहात ब्रिटन आणि नेपाळच्या संबंधांचा

पाया रचला गेला. १९५१ मध्ये नेपाळच्या राजाने स्वतःचे मंत्रिमंडळ बनवले आणि विविध राजकीय पक्षांना त्यात स्थान दिले. नेपाळमध्ये १९९६मध्ये माओवाद्यांनी उठाव केला. २००१मध्ये नेपाळच्या राजपुत्रानेच राजघराण्यातील सदस्यांची हत्या केली. २००७ मध्ये नेपाळने नवी राज्यघटना स्वीकारली आणि नेपाळमधील राजेशाही कायमची नष्ट होऊन तिथे संघराज्यात्मक लोकशाही प्रजासत्ताक अस्तित्वात आले. तेव्हापासून तेथील जनता नेपाळचा अध्यक्ष निवडून देऊ लागली.

भारत आणि नेपाळदरम्यान मैत्री आणि सहकार्याचे संबंध वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या देशांदरम्यानची सीमा खुली असून, जनतेमध्ये दृढ सांस्कृतिक संबंधांच्या आधारावर आदानप्रदान होते. दोन्ही बाजूचे लोक सहजपणे सीमा ओलांडून ये-जा करू शकतात. नेपाळच्या सीमेची एकूण लांबी १८५० किलोमीटर आहे. दक्षिणेकडे सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या पाच राज्यांच्या सीमांना ती स्पर्श करते, तर उत्तरेकडे ती चीनच्या तिबेट प्रदेशाला लागून आहे.

भारताचे नेपाळविषयीचे धोरण ठरवताना साधारण पुढील बाबींचा विचार होतोः

(i) कोणत्याही सागरी सीमा नसल्याने नेपाळ हा चोहोबाजूंनी जमिनीने वेढलेला प्रदेश (भूवेष्टित) बनला आहे. भारत आणि चीन या दोन मोठ्या देशांमध्ये आहे. नेपाळमधील महत्त्वाचे व्यापारी मार्ग भारताच्या बाजूने आहेत. हिमालयाच्या उत्तुंग पर्वतराजीत उगम पावणाऱ्या नद्याही दक्षिणवाहिनी असून, त्या नेपाळमधून भारतात प्रवेश करतात.

(ii) भारत आणि नेपाळला समान सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्यामुळेच दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंध अतिशय जिव्हाळ्याचे आहेत.

भारत आणि नेपाळ दरम्यान १९५०मध्ये झालेल्या मैत्री व शांतता कराराने दोन्ही देशांच्या विशेष संबंधांची पायाभरणी केली. भारत स्वतंत्र झाला, तेव्हा जगभर शीतयुद्धाची स्थिती होती. १९४९ मध्ये चीन हा साम्यवादी देश बनला आणि त्याने तिबेटवर कब्जा केला. त्यावेळी नेपाळ संबंधात भारतीय संसदेत बोलताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले की, नेपाळच्या बाबतीत काही चुकीचे घडल्यास त्याने भारताच्या संरक्षणालाही धोका निर्माण होऊ शकतो. दोन्ही देशांदरम्यानच्या मैत्री व शांतता करारामध्ये याचे प्रतिबिंब उमटले. नेपाळ त्याच्या संरक्षणासाठी भारताच्या मदतीने आणि भारतीय प्रदेशातून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याची आयात करू शकतो, असेही या तहात नोंदवण्यात आले आहे. परकीय आक्रमणापासून कोणालाही धोका उत्पन्न झाला तर दुसरा देश ते सहन करणार नाही, असेही त्यात नोंदवण्यात आले. या प्रदेशात नेपाळचा चीन हाच दुसरा शेजारी असल्याने त्यापासून नेपाळच्या संरक्षणाची जबाबदारी आपोआपच भारताने घेतली.

तरीही नेपाळसमोर एक प्रकारचे व्दंव्द आणि समस्या उभी राहिली. भूराजकीय दृष्टिकोनातून नेपाळ हा त्याच्या अस्तित्वासाठी भारतावर अवलंबून आहे. मात्र, त्याला स्वतःचीही स्वतंत्र ओळख प्रस्थापित करावयाची होती. त्यामुळे नेपाळने १९६०मध्ये चीनबरोबरही मैत्री आणि शांततेचा तह केला. त्यातून भारत व नेपाळ संबंधांत ताण निर्माण झाला. १९७५ मध्ये नेपाळने स्वतःला शांतता क्षेत्र जाहीर केले. भारताबरोबर आपले संबंध विविधांगी आणि दृढ असले, तरी चीनबरोबरही आपले जिव्हाळ्याचे व मैत्रीचे संबंध आहेत, असे नेपाळने सांगितले. या मागे भारतावरचे आपले अवलंबित्व कमी करण्याची नेपाळची इच्छा स्पष्ट दिसत होती. त्यानंतर १९९०च्या दशकात नेपाळच्या ग्रामीण भागात माओवादी चळवळ उभी राहिली आणि नंतर ती संपूर्ण नेपाळभर पसरली. त्यातून भारत व नेपाळ संबंधांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. नव्या शतकात नेपाळमधला माओवाद्यांच्या प्रभाव वाढला आणि त्यांनी तेथे सत्ता स्थापन केली. याचा नेपाळच्या भारताबरोबरील संबंधांवर निश्चितच परिणाम झाला.

तरीही भारत आणि नेपाळने परस्परांच्या सुरक्षाविषयक बाबींवर संयुक्तपणे तोडगा काढण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभी केली आहे. दोन्ही देशांच्या गृहसचिवांची ठराविक काळाने चर्चा होते. सीमेवरून निर्माण होऊ शकणाऱ्या तणावांचा निचरा करण्यासाठी सीमा व्यवस्थापनासाठी संयुक्त कृतीगट आणि सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

भारत-नेपाळदरम्यानचे संरक्षण क्षेत्रातील संबंधही विविधांगी आहेत. नेपाळच्या लष्कराला शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणि प्रशिक्षणासाठी भारत मोठ्या प्रमाणावर मदत करतो. दोन्ही देशांमधील नेत्यांच्या परस्परांना भेटीबरोबरच नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी सहकार्य, संयुक्त लष्करी सराव, हिमालयातील संयुक्त साहसी मोहिमांच्या माध्यमातून हे संबंध निकोप राहिले आहेत. नेपाळी लष्कराच्या अधिकाऱ्यांना भारतात प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर भारत-नेपाळ दरम्यान 'सूर्यकिरण' या नावाने बटालियन पातळीवरचा युद्धसराव वर्षातून दोन वेळा केला जातो.

दोन्ही देशांमधील चांगल्या लष्करी संबंधांचे प्रतीक म्हणून १९५० पासून दोन्ही देशांच्या लष्करप्रमुखांना एकमेकांच्या प्रदेशात मानद सेनानायकाचा म्हणजे जनरलचा सन्मान दिला जातो. भारतीय लष्करातल्या गोरखा रेजिमेंटसाठी नेपाळच्या पहाडी जिल्ह्यांमधून सैनिकभरती केली जाते. भारतीय लष्करात सध्या नेपाळमधले ३२ हजार गोरखा जवान कार्यरत आहेत.

## भूतान



थिंपू येथील राजवाडा

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारत आणि भूतानदरम्यान १९४९ मध्ये झालेल्या मैत्री व सहकार्य कराराने दोन्ही देशांच्या संरक्षण व परराष्ट्र संबंधांची पायाभरणी झाली. २००५ मध्ये भूतानचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचूक यांनी भूतानच्या राज्यघटनेचा मसुदा जाहीर केला.

भारत आणि भूतानदरम्यानचे विशेष संबंध परस्पर विश्वास आणि समजुतीच्या पायावर उभे आहेत. या द्विपक्षीय संबंधांची मूलभूत चौकट १९४९ मधील मैत्री आणि सहकार्य कराराने निश्चित करून दिली आहे. या कराराने दोन्ही देशांना शांतता राखण्याचे आणि परस्परांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भूतानचे परराष्ट्र धोरण सामान्यपणे भारताने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे चालते. परराष्ट्र आणि संरक्षण व्यवहारांमध्ये दोन्ही देश परस्परांचा सल्ला घेतात.

२००७ मध्ये भारत आणि भूतानने त्यांच्या दरम्यानच्या कराराचा फेरविचार केला आणि त्यातील भूतानचे परराष्ट्र धोरण भारताच्या मार्गदर्शनानूसार चालेल, हे कलम रद्द करण्यात आले. मात्र, त्यानंतरही थिंपूचे राज्यकर्ते भारताशी समन्वयानेच त्यांचे परराष्ट्र संबंध आखत राहिले. २००८मध्ये भूतानमधील राज्यघटनेनुसार तेथे पहिल्यांदा संसदीय निवडणुका झाल्या.

भारत आणि भूतानदरम्यानची सीमा ६६९ किलोमीटर लांब आहे. सीमारेषेवर भारताच्या बाजूने सशस्त्र सीमा बलाचा (SSB) आणि भूतानच्या बाजूने रॉयल भूतानीज् आर्मीचा पहारा असतो. भारताच्या पूर्वोत्तर राज्यांमध्ये घातपाती कारवाया करणाऱ्या गटांचे तळ मुख्यतः आसामच्या सीमेला लागून आहेत. अशा अतिरेकी गटांविरोधात कारवाईसाठी भारत आणि भूतानने २००३ मध्ये संयुक्त मोहीम राबवली होती. भूतानच्या लष्कराने त्यांच्या प्रदेशातील बंडखोरांविरोधात कारवाई केली. त्यावेळी हे बंडखोर सीमा ओलांडून भारतात येणार नाहीत, याची दक्षता भारताने घेतली.

डोकलाममध्ये चीनच्या सैन्याविरोधात भारताने घेतलेल्या ठाम भूमिकेच्या वेळी भारत-भूतान संरक्षण सहकार्याचे अनोखे दर्शन घडले. डोकलामचे पठार भारत, चीन आणि भूतानच्या सीमांवर आहे. चीन आणि भूतानदरम्यान या पठारांच्या नियंत्रणावरून वाद आहेत. २०१७ मध्ये चिनी सैन्याने या भागात रस्तेबांधणीचे प्रयत्न चालवले. त्याला भारतीय लष्कराने हरकत घेतली. भारतीय लष्कर भूतानच्या मागे ठामपणे उभे राहिले. यातून संघर्षाची स्थिती (स्टॅन्डऑफ) निर्माण झाली. त्यातून भारत संकटाच्या प्रसंगी आपल्या मित्रांच्या पाठीशी ठामपणे उभा राहतो, असा संदेश संपूर्ण जगाला गेला.

## बांगलादेश



संसदभवन ढाका

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारताची १९४७ मध्ये फाळणी झाली, तेव्हा पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान निर्माण झाले. पूर्व पाकिस्तानला अधिक स्वायत्तता देण्यात यावी, अशी तिथल्या जनतेची मागणी होती. त्यावरून पूर्व व पश्चिम पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला. त्यातून पूर्व पाकिस्तानात बंगाली अस्मितेच्या आधारावर स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीचे नेतृत्व अवामी लीग पक्षाने केले. भारताचा त्याला काही प्रमाणात पाठिंबा होता. त्यातून १९७१ च्या युद्धात स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली. शेख मुजीबूर रेहमान बांगलादेशाचे संस्थापक हे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले.

डिसेंबर १९७१ च्या युद्धात बांगलादेश मुक्तीनंतर त्याला स्वतंत्र व वेगळा देश म्हणून मान्यता देणारा भारत हा पहिला देश होता. भारताने लगेचच बांगलादेशाबरोबर राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. या दोन्ही देशांचे संबंध इतिहास आणि समान सांस्कृतिक व भाषिक वारशावर आधारित आहेत. भारताच्या बांगलादेशाशी असणाऱ्या संबंधांना भूराजकीय वास्तवाचे भक्कम परिमाण आहे. बांगलादेश तीन बाजूंनी भारताने वेढलेला आहे. त्याच्या आग्नेय बाजूला म्यानमार आणि दक्षिणेला बंगालचा उपसागर आहे. बांगलादेशाची सुरक्षा आणि एकात्मता यात आपले महत्त्वाचे हितसंबंध गुंतलेले असल्याचे भारताने वेळोवेळी स्पष्ट केले आहे.

भारताने १९७२ मध्ये बांगलादेशाबरोबर मैत्री करार केला. ही द्विपक्षीय संबंधांची सुरुवात होती. या करारात असे स्पष्ट करण्यात आले की, दोन्ही देश एकमेकांविरोधातल्या कोणत्याही लष्करी आघाडीत सहभागी होणार नाहीत. बांगलादेशाला त्याच्या सैन्याच्या उभारणीतही भारताने मदत केली. हेलिकॉप्टर्स, वाहतुकीसाठीची विमाने, गस्तीनौका असे साहित्य भारताने त्याला उपलब्ध करून दिले.

१९७५मध्ये बांगलादेशाचे नेते शेख मुजीबुर रहमान यांची हत्या झाली. त्यानंतर सत्तेवर आलेल्या सरकारने बांगलादेश हा इस्लामी प्रजासत्ताक असल्याचे जाहीर केले.

बांगलादेशाच्या निर्मितीनंतर तेथील अवामी लीगच्या सरकारपुढेही काही आव्हाने उभी राहिली. १९७५ मध्ये तिथल्या लष्कराने उठाव करून सरकार उलथवून टाकले. त्यानंतरही बांगलादेशात अस्थिर वातावरण व हिंसक संघर्ष सुरू राहिला. अखेर १९७८मध्ये बांगलादेशातील लष्कराच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन झाले. १९९१ मध्ये बांगलादेशात निवडणुका होऊन लोकनियुक्त सरकार सत्तेवर आले. तेव्हापासून तेथे बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी आणि अवामी लीग हे पक्ष आलटून पालटून सत्तेवर आहेत.

भारत आणि बांगलादेशादरम्यान वादाचे काही मुद्दे पुढीलप्रमाणे:

(i) भारताने हुगळी नदीचा पाणीपुरवठा वाढवण्यासाठी फराक्का बंधारा बांधण्याच्या निर्णयावर बांगलादेशाने टीका केली. त्यामुळे बांगलादेशाला गंगेच्या पाण्यातील योग्य वाटा मिळत नाही. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची टंचाई होते, तर पावसाळ्यात जादा पाण्याच्या विसर्गामुळे पुराचे संकट निर्माण होते, असा बांगलादेशाचा आरोप आहे. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी दोन्ही देशांदरम्यान १९७७ मध्ये पहिल्यांदा करार झाला. तो संपुष्टात आल्यानंतर १९९६ मध्ये भारत आणि बांगलादेशादरम्यान गंगा पाणीवाटप करार करण्यात आला.



फराक्का बंधारा

(ii) बांगलादेशातील काही भाग व गावे पश्चिम बंगालने वेढलेली होती. त्यावर उपाय म्हणून भारताने १९९२ मध्ये बांगलादेशाला या प्रदेशांशी संपर्कासाठी तीन बिघा कॉरिडॉर उपलब्ध करून दिला. सन २०१५ मध्ये झालेल्या भारत–बांगलादेश भूसीमा करारात भारत आणि बांगलादेशाने परस्परांच्या भूभागाने वेढलेल्या भागांचे आदानप्रदान केले आणि दोन्ही देशांदरम्यानचा नकाशा नव्याने आखून घेतला.

(iii) गंगानदीच्या मुखाशी असलेल्या सुंदरबन भागातील न्यू मूर आयलँड या निर्जन बेटावर भारत आणि बांगलादेश दोघेही मालकी हक्क सांगत होते. हे बेट दोन मैल लांब आणि दीड मैल रुंद आहे. बांगलादेश या बेटाला दक्षिण तळपट्टी म्हणून संबोधत असे. त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम नव्हते. १९८१ मध्ये भारताने आपली निमलष्करी दले तिथे पाठवून तिरंगा ध्वज फडकवला. तेव्हापासून ते बेट भारताच्या ताब्यात होते. २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या लवादाने या बेटाच्या मालकीचा वाद समाधानकारकरीत्या सोडवला. परंतु, सध्या समुद्राची पातळी वाढल्याने हे बेट पाण्याखाली गेले आहे.

(iv) बेकायदेशीर घुसखोरी हा दोन्ही देशांदरम्यानच्या संबंधांमधला सर्वांत वादग्रस्त मुद्दा आहे. १९७१ मध्ये बांगलादेश मुक्तीसाठी युद्ध झाले, त्याच्या आधीपासून लक्षावधी बांगलादेशी निर्वासित भारतात आश्रयाला आले; युद्धानंतर त्यांना परत पाठवण्यात आले. परंतु तहानंतर बांगलादेशातून असंख्य घुसखोर बेकायदेशीररीत्या भारताच्या पूर्व आणि पूर्वोत्तर सीमांवरील राज्यांत घुसले. मोठ्या प्रमाणावरील बेकायदेशीर घुसखोर हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेला मोठा धोका आहे. त्यातून पूर्वोत्तर राज्यांमधील सीमावर्ती भागात लोकसंख्येचे प्रमाणही बदलले आहे. त्याविरोधात स्थानिक जनतेमध्ये असंतोषाची भावना आहे.

(v) बांगलादेशाने चीनबरोबर संरक्षण सहकार्यासाठी अधिकृत करार केला आहे. चीन आणि बांगलादेशाचे सामरिक संबंध हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना २०१७ मध्ये भारताच्या दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी उभय पक्षांमध्ये अनेक करार आणि सामंजस्य करार झाले. त्यात संरक्षण क्षेत्रातील सहकार्याचाही समावेश आहे. संरक्षण क्षेत्रात परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्याची दोन्ही देशांना इच्छा असल्याचे त्यातून प्रतीत झाले.

## श्रीलंका



राष्ट्राध्यक्षांचे सचिवालय, कोलंबो

**तुम्हांला माहीत आहे का?**

सिलोन १९४८ मध्ये स्वतंत्र झाले. १९७२ मध्ये त्याचे नाव श्रीलंका असे बदलण्यात आले. श्रीलंकेतील बहुसंख्य सिंहली जनता आणि तामिळ फुटीरतावाद्यांमध्ये जुलै १९८३ मध्ये युद्ध सुरू झाले. श्रीलंका सरकार आणि लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम (एलटीटीई) यांच्यात पाव शतकाहूनही अधिक काळ संघर्ष सुरू राहिला. २००२ मध्ये नॉर्वेच्या पुढाकाराने श्रीलंका सरकार व तामिळ बंडखोरांदरम्यान युद्धविराम झाला. त्यामुळे अंतर्गत संघर्ष काही काळ थंडावला, तरी २००६ नंतर तो पुन्हा वाढीस लागला. अखेर मे २००९ मध्ये श्रीलंका सरकारने तामिळ बंडखोरांचा संपूर्ण पराभव केला.

श्रीलंका हिंदी महासागरातील एक लहान, परंतु सामरिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा देश आहे. भारताच्या आग्नेय किनाऱ्यावर असलेल्या या देशाचे स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतंत्र धोरण आहे. पाल्कची सामुद्रधुनी आणि मन्नारच्या आखाताने भारत आणि श्रीलंका वेगळे झाले आहेत. हिंदी महासागरात भूराजकीय दृष्ट्या परस्परांच्या अगदी निकट असलेल्या या देशांचे सामरिक भवितव्य त्यामुळेच एकत्र बांधले गेले आहे.

श्रीलंकेत १९७७, १९८१ आणि १९८३ मध्ये तामिळांच्या विरोधात मोठ्या वांशिक दंगली घडल्या. त्यामुळे सरकार आणि तामिळ जनतेमध्ये दुरावा उत्पन्न होऊन संघर्ष निर्माण झाला. तो उत्तरोत्तर वाढतच गेला. आपल्याला मिळणाऱ्या भेदभावाच्या व अन्याय्य वागणुकीचा तामिळ जनतेने निषेध केला आणि आपल्याला प्रादेशिक स्वायत्तता व काही प्रमाणात सत्तेतला वाटा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. श्रीलंकेतील सरकार आणि बहुसंख्य सिंहली जनतेने त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी, तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रंट (TULF) आणि लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम (LTTE) या संघटना हिंसक बनल्या आणि तामिळी जनतेला वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी त्यांनी हिंसाचार सुरू केला. नंतर एलटीटीई ही तामिळी अतिरेक्यांची संघटना अतिशय शक्तिशाली बनली. श्रीलंकेच्या उत्तर आणि पूर्व भागात स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याबरोबरच श्रीलंका सरकार आणि सिंहलींशी संबंधित ठिकाणांवर त्यांनी हल्ले सुरू केले. कालांतराने १९८६ च्या सुमारास श्रीलंकेतील जाफना द्वीपकल्पावर एलटीटीईने पूर्ण वर्चस्व मिळवले. श्रीलंकेच्या उत्तर व पूर्व प्रांतांना वेगळे करून स्वतंत्र तामिळ राज्याचा (ईलम) दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

१९८६-८७ मध्ये श्रीलंकेतील यादवी संघर्ष वाढत गेला आणि श्रीलंकेतील लष्कराने तामिळींविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला. काही तामिळी गटांना भारताने आश्रय दिला, आर्थिक सहाय्य केले आणि काही प्रमाणात शस्त्रास्त्रेही दिली. तामिळींचा प्रश्न हा श्रीलंकेची अंतर्गत बाब असून, भारताने त्यात हस्तक्षेप करणे थांबवावे, असे तेथील सरकारने बजावले. मोठ्या प्रमाणावर विविधता असलेल्या समाजांमध्ये कोणताही एक धर्म, वंश किंवा भाषा हा त्या देशापासून वेगळे होण्याचा आधार असू नये, यावर भारताचा विश्वास होता. श्रीलंका सरकार आणि तामिळ फुटीरतावादी गटांना एकत्र आणून त्यांच्यात समझोता घडवण्याची भारताची इच्छा होती. श्रीलंकेतील अभावग्रस्त तामिळ जनतेला भारताने अन्नधान्य व इतर साहित्याचा पुरवठा केला. दोन्ही देशांदरम्यान हा संघर्ष कमी करण्यासाठी राजनैतिक हालचाली करण्यात आल्या. त्याची परिणती म्हणून भारत आणि श्रीलंकेदरम्यान २९ जुलै १९८७ रोजी करार करण्यात आला.

या करारानुसार श्रीलंकेच्या अध्यक्षांच्या विशेष विनंतीवरून भारताने श्रीलंकेत शांतिफौजा (इंडियन पीसकिपिंग फोर्स - IPKF) पाठवण्याचे ठरवले. श्रीलंकेतील तीन वर्षांच्या वास्तव्यादरम्यान शांतीफौजेने प्रामुख्याने तीन कामांवर लक्ष केंद्रित केले: शांतता प्रस्थापित करणे, एलटीटीईविरुद्ध युद्ध करणे आणि शांतता प्रस्थापनेसाठी बंडखोरविरोधी मोहिमा आखणे.

भारत आणि श्रीलंकादरम्यान संरक्षणाशी संबंधित इतर काही मुद्दे पुढीलप्रमाणे:


**(i) सागरी सुरक्षा :** भारत आणि श्रीलंकेने आपल्या सागरी सीमा निश्चित केल्या आहेत. दोन्ही देशांदरम्यानच्या १९७४ च्या करारात भारतीय मासेमारांच्या सुरक्षेसंबंधी तरतुदी आहेत. बंगालचा उपसागर आणि मन्नारच्या आखातातील सागरी हद्द निश्चित करण्यासाठी भारत व श्रीलंकेदरम्यान १९७६ मध्ये करार करण्यात आला. मात्र, या करारामुळे पाल्कच्या सामुद्रधुनीत मासेमारी करण्याच्या भारतीय मासेमारांच्या हक्कांवर बंधने आली आहेत. कच्छतिवू भागातील श्रीलंकेच्या हद्दीतील समुद्रात मासेमारी करण्यास भारतीयांवर बंदी घालण्यात आली आहे.

**(ii) चीन :** भारत आणि चीन हे दोन्ही शेजारी देश सागरी सत्ताही आहेत. गेल्या काही वर्षांत चीनने म्यानमारमधील अक्याब, कोको द्वीपसमूह, चेदुबा आणि बॅसेन, तसेच बांगलादेशातील चितगांव येथील बंदरे विकसित करण्यास मदत केली आहे. या बंदरांच्या साह्याने बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागरातील सागरी मार्गांवर वर्चस्व राखण्याचा व नियंत्रण ठेवण्याचा चीनचा प्रयत्न आहे. तसेच, श्रीलंकेतील हम्बनटोटा बंदराच्या पहिल्या टप्प्यातील विकासात चीनचा सहभाग आहे. काही सुरक्षा विश्लेषकांच्या मते चीन भारताला चारी बाजूंनी वेढण्यासाठी अशा प्रकारे बंदरांचा विकास करत आहे. या धोरणाला 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' (मोत्यांची माळ) असे म्हटले जाते. हिंदी महासागरात पूर्वनियोजित साखळीत बंदरांचा विकास करून या प्रदेशावर स्वत:चा लष्करी व आर्थिक प्रभाव निर्माण करण्याचे चीनचे प्रयत्न आहेत.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**स्ट्रिंग ऑफ पर्ल्स :** चीन भारताला हिंदी महासागरात वेढा घालण्यासाठी विविध सामरिक महत्वाच्या ठिकाणी बंदरे व पायाभूत सुविधा विकसित करत आहे. हे धोरण 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' नावाने ओळखले जाते. त्यात पाकिस्तानातील ग्वादार, श्रीलंकेतील हम्बनटोटा, बांगलादेशातील चितगांव, म्यानमारमधील क्यॉक्प्यु आणि चीनच्या कोको द्वीपसमूहातील लष्करी तळाचा समावेश आहे. या बंदरांचा भारताच्या सुरक्षेला मोठा धोका आहे.

## अफगाणिस्तान



संसदभवन, काबूल

**तुम्हांला माहीत आहे का?**

अहमदशहा दुर्राणी यांनी पश्तुन टोळ्यांना संघटित करून १७४७ मध्ये अफगाणिस्तानची स्थापना केली. ब्रिटिश आणि रशियन साम्राज्यांच्या दरम्यान मध्यगत प्रदेश म्हणून अफगाणिस्तानने दीर्घ काळ भूमिका बजावली. ब्रिटिशांच्या अमलातून अफगाणिस्तान १९१९मध्ये स्वतंत्र झाला. अफगाणिस्तानात लोकशाही रुजवण्याचा प्रयत्न अल्प काळ टिकला. १९७३ मध्ये उठाव होऊन तिथली लोकशाही संपुष्टात आली. १९७८ मध्ये अफगाणिस्तानात साम्यवाद्यांनी उठाव केला. त्यानंतर दुसऱ्याच वर्षी १९७९ मध्ये अफगाणिस्तानातील साम्यवादी राजवटीला समर्थन

देण्यासाठी सोव्हिएत रशियाने त्यात हस्तक्षेप केला. तेव्हा अफगाणिस्तानात घुसलेल्या सोव्हिएत फौजा दशकभराने म्हणजे १९८९ मध्ये अफगाणिस्तानातून बाहेर गेल्या. त्यानंतर अफगाणिस्तानात अंतर्गत संघर्ष उफाळून आले. त्याची परिणती १९९६ मध्ये तालिबान राजवट सत्तेवर येण्यात झाली. अमेरिकेवरील ११ सप्टेंबर २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिका आणि मित्र देशांनी अफगाणिस्तानवर हल्ला चढवला. अफगाणिस्तानातील नॉर्दर्न अलायन्स ही तालिबानविरोधी आघाडीही त्यात सहभागी होती. त्यातून अफगाणिस्तानातील तालिबानची राजवट संपुष्टात आली.

२००१ मध्ये अफगाणिस्तानच्या पुनर्रउभारणीसाठी संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने एक जागतिक परिषद झाली. त्यात राजकीय प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याबरोबरच अफगाणिस्तानसाठी नवे संविधान तयार करण्याचाही समावेश होता. त्यानुसार अफगाणिस्तानात २००४ मध्ये अध्यक्षीय निवडणुका झाल्या आणि २००५ मध्ये नॅशनल असेंब्लीच्या निवडणुका झाल्या. या घडामोडींनंतरही अफगाणिस्तानातील सरकारसमोर तालिबानचे गंभीर आव्हान प्रांताप्रांतांमध्ये कायम आहे.

अफगाणिस्तानातील तालिबान राजवट २००१ मध्ये संपुष्टात आल्यानंतर भारत अफगाणिस्तान संबंधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. भारत आणि अफगाणिस्तानच्या संबंधांमध्ये कोणत्याही प्रदेश किंवा सीमेवरून वादाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अफगाणिस्तानातील अंतर्गत संघर्षाच्या काळात १९९० च्या दशकात तेथील उत्तर आघाडीला (नॉर्दर्न अलायन्स) भारताने पाठिंबा दर्शवला होता. त्याचा अफगाणिस्तानातील तालिबानोत्तर काळात भारताला फायदा झाला. अफगाणिस्तानचे भारताच्या दृष्टीने सामरिक महत्त्व असून, मध्य आशियातील तुर्कमेनिस्तान, कझाकस्तान अशा खनिज तेलाने समृद्ध देशांशी संपर्कासाठी तो एक दुवा आहे.

भारत आणि अफगाणिस्तानदरम्यान २०११ मध्ये सामरिक सहकार्य करार झाला. त्यानुसार अफगाणिस्तानातील पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक उभारणीसाठी भारत अनेक प्रकारे सहकार्य करत आहे. तेथील शिक्षणसंस्थांच्या उभारणीबरोबरच विविध क्षेत्रांत तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भारत अफगाणिस्तानला मदत करत आहे. अफगाणिस्तानातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपयोगासाठी तेथील गुंतवणुकीला चालना देणे, अफगाणिस्तानातून भारतात होणाऱ्या निर्यात वस्तूंवर आयातशुल्क माफ करण्यासह तेथील शांतता आणि संवादाच्या व्यापक प्रक्रियेत भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अफगाणिस्तानातील राष्ट्रीय सुरक्षा दलांना प्रशिक्षण व इतर साहाय्य भारत करत आहे. मात्र, अफगाणिस्तानात कोणत्याही प्रकारचा लष्करी हस्तक्षेप टाळून नागरी विकासाच्या विविध क्षेत्रांत मदती करण्यावर भारताचा भर आहे. त्याला 'सॉफ्ट पॉवर' धोरण असे म्हटले जाते.

अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी भारताने पुढीलप्रमाणे अनेक पावले उचलली आहेत.

(i) अफगाणिस्तानच्या राष्ट्र उभारणीसाठी भारत विविध प्रकारचे साहाय्य करत आहे. त्यासाठी भारताने तेथील अनेक प्रकल्पांना मदत केली आहे. यामध्ये

(अ) काबूलमध्ये अफगाणिस्तानच्या संसदेची इमारत बांधणे,

(ब) काबूलमधील हबिबिया हायस्कूलच्या इमारतीची पुनर्रउभारणी करणे आणि त्यासाठी आवश्यक ते अर्थसाह्य करणे,

(क) भारत–अफगाणिस्तान मैत्री धरण म्हणून प्रसिद्ध असलेल्या सलमा धरणाचे बांधकाम करणे,

(ड) पुल–ए–खुमरी ते काबूलपर्यंत वीजवाहक तारा व ट्रान्स्फॉर्मर्सची उभारणी करणे,

(इ) कंदाहारमधील अफगाण नॅशनल ॲग्रिकल्चर सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीच्या उभारणीसाठी अर्थसाह्य करणे,

(फ) काबूलमधील चिमताला येथे विद्युत उपकेंद्राची उभारणी करणे,

(ग) कंदाहारमध्ये क्रिकेट खेळासाठीचे अद्ययावत क्रीडांगण बांधणे,

(ह) अफगाणिस्तानातील राष्ट्रीय दूरचित्रवाणी प्रसारणाचा विस्तार करणे, आदींचा त्यात समावेश आहे. तसेच अफगाणिस्तानातील विविध प्रांतात विंधनविहीरी खोदून पाणीपुरवठा उपलब्ध करण्यासाठीही भारत मदत करत आहे.

**(ii)** अफगाणिस्तानच्या संरक्षणाशी संबंधित काही प्रकल्पांमध्येही भारत विविध प्रकारे साह्य करत आहे. उदाहरणार्थ,

(अ) केवळ अफगाणिस्तानसाठीच नव्हे, तर भारतासाठीही सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या झारंज–डेलाराम महामार्गाची उभारणी भारत करत आहे. अफगाणिस्तानच्या सीमेवरील झारंज या छोट्या शहराला डेलाराम या मोठ्या शहराशी जोडणारा हा मार्ग आहे. त्याच्या उभारणीत भारताने मोठे आर्थिक योगदान दिले आहे. इराणमधील चाबहार हे बंदर भारत विकसित करत आहे. तेथून झारंज–डेलाराम मार्गे अफगाणिस्तानात वाहतुकीचा खात्रीशीर पर्यायी मार्ग भारताला उपलब्ध होईल. तसेच, मध्य आशियातील देशांनाही त्याद्वारे सागरी वाहतुकीचा पर्यायी मार्ग खुला होईल.

(ब) पश्चिम अफगाणिस्तानमधील हेरात प्रदेशातील चिश्ती शरीफ जिल्ह्यातून वाहणाऱ्या हरी नदीवर जलविद्युत निर्मिती आणि पाणी पुरवठ्यासाठी धरण बांधण्यासाठी मदत केली. या धरणाला अफगाणिस्तान –भारत मैत्री धरण (पूर्वीचे सलमा धरण) असे म्हणतात.



**अफगाणिस्तान–भारत मैत्री धरण**

(क) अफगाणिस्तानातील काबूल नदीवर शाहतूत येथे धरणाच्या बांधकामासाठी भारत मदत करत आहे. ते पूर्ण झाल्यानंतर काबूल नदीचे पाकिस्तानात वाहून जाणारे पाणी अफगाणिस्तानला त्याच्या विकासासाठी वापरता येईल.

(ड) त्याचबरोबर अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय सैन्याला भारताने २८५ लष्करी वाहनांबरोबरच MI २५ आणि MI३५ ही हेलिकॉप्टर्सही दिली आहेत.

दक्षिण आशियातील लहान शेजारी देशांसंबंधीचे भारताचे धोरण पुढील दोन बाबींवर आधारलेले आहे.

(i) दक्षिण आशियात शांतता, स्थैर्य आणि सुव्यवस्थेचे वातावरण कायम राहणे भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या रक्षणासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे या देशांशी भारताने सुरक्षा करार केले आहेत. हे करार बहुतांशी द्विपक्षीय स्वरूपाचे आहेत.

(ii) भारतासह हे सर्व देश दक्षिण आशिया प्रादेशिक सहकार्य परिषदेचे (साऊथ एशियन असोसिएशन ऑफ रिजनल कोऑपरेशन- SAARC) सदस्य आहेत. त्याचबरोबर 'बे ऑफ बेंगॉल इनिशिएटिव्ह फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन' (BIMSTEC) या संघटनेचे भारतासह बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका, थायलंड, नेपाळ आणि भूतान हे सदस्य देश आहेत. अफगाणिस्तान हा शांघाय सहकार्य परिषदेचे सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशा प्रादेशिक सहकार्य संघटनांच्या माध्यमातून दक्षिण आशियात स्थैर्य व शांतीचे वातावरण कायम राखण्याचा भारताचा प्रयत्न आहे.




पश्चिम आशिया

भारत जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा पश्चिम आशियातील अनेक देश पाश्चिमात्य देशांच्या नियंत्रण व प्रभावाखाली होते. यातील बहुतेक देशांची धोरणे साम्यवादविरोधी आणि पाश्चिमात्यांच्या बाजूने झुकलेली होती.

भारताने पॅलेस्टाईनच्या चळवळीला पाठिंबा दिला होता आणि अरब राष्ट्रवादाचेही समर्थन केले होते. या काळात भारताची भूमिका इस्रायलवर टीका करणारी होती. मात्र, पश्चिम आशियातील बहुतांश देशांचा इस्लामी बंधुतेच्या नावाखाली पाकिस्तानला व त्याच्या काश्मीरविषयक धोरणाला पाठिंबा होता. या काळात 'बगदाद करार' नावाने झालेल्या 'सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन' (CENTO) पाकिस्तान सदस्य बनला. इराण, इराक व तुर्कस्थानही त्याचे सदस्य होते.

पश्चिम आशियातील देशांपैकी इजिप्तशी भारताचे सलोख्याचे संबंध होते. १९५६ मध्ये सुएझ कालव्याच्या नियंत्रणावरून झालेल्या वादात भारताने इजिप्तची बाजू उचलून धरली होती. अलिप्ततावादी चळवळीच्या संस्थापकांमध्ये भारताचे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबरच इजिप्तचे अध्यक्ष गमाल अब्दुल नासेर, घानाचे क्वामे नक्रुमा, इंडोनेशियाचे सुकार्नो आणि युगोस्लाव्हियाचे मार्शल जोसिप ब्रॉझ टिटो यांचा समावेश होता. सद्दाम हुसैन यांच्या राजवटीत भारताचे इराकशी असलेले संबंध घनिष्ट, बहुआयामी आणि फलदायक होते. भारताने इराकमध्ये अनेक प्रकल्प राबवले. इराकच्या हवाई दलाला प्रशिक्षण देण्यातही भारताचा पुढाकार होता. इराक हा भारताचा प्रमुख तेलपुरवठादार देश होता. या दोन्ही देशांचे सोव्हिएत रशियाशी घनिष्ट संबंध होते.

सन १९६९ मध्ये 'इस्लामी देशांची संघटना' (ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशन) स्थापन झाली. या संघटनेने भारताच्या काश्मीरसंबंधी धोरणांविरोधात आणि भारतातील मुस्लिमांच्या स्थिती संदर्भात अनेक वेळा ठराव, शिफारशी आणि निवेदने संमत केली. १९७९ मध्ये सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसल्यानंतर त्याविरोधात पाकिस्तान आणि सौदी अरेबियाने अमेरिकेला सहकार्य केले आणि अफगाणिस्तानातील सोव्हिएत फौजांविरोधात मुजाहिदिनांची सेना उभी केली.

सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर जगातील शीतयुद्ध समाप्त झाले. त्यानंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये क्रांतिकारक बदल झाले. नव्या भूराजकीय वास्तवाशी जुळवून घेण्याचे प्रयत्न भारताने केले. केवळ आदर्शवादावर उभारलेल्या आंतरराष्ट्रीय धोरणाऐवजी भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांना महत्त्व देणारे सुरक्षा धोरण भारताने स्वीकारले. यात अमेरिकेबरोबर सामरिक संबंध प्रस्थापित करण्याचाही समावेश होतो. तसेच, पश्चिम आशियात मोजक्याच देशांना महत्त्व न देता, तेथील सर्वच देशांशी समान हितसंबंध व लाभाच्या आधारावर संबंध प्रस्थापित करण्यास भारताने सुरुवात केली. त्याचाच एक भाग म्हणून भारताने १९९२ मध्ये इस्रायलशी पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. इराणबरोबर संवादालाही भारताने प्राधान्य दिले. खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा अखंड सुरू रहावा, यासाठी 'आखाती सहकार्य परिषदेशी' (गल्फ कोऑपरेशन कौन्सिल) भारताने व्यापारी भागीदारी सुरू केली. याच परिषदेने पुढे नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा कठोर निषेध केला. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीनेही दहशतवादविरोधी मुद्द्यांवर भारताला वेळोवेळी सहकार्य दिले.

पश्चिम आशियातील देशांशी भारताने संरक्षणाच्या संदर्भात केलेले काही करार पुढीलप्रमाणे:

**सौदी अरेबिया :** संयुक्त लष्करी सराव, दहशतवादविरोधी मोहिमा, गुप्तवार्ता संकलनात सहकार्य, हवाला किंवा इतर अवैध प्रकारे दहशतवादी गटांना पैशाचा पुरवठा यासह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सौदी अरेबियाने भारताला सहकार्याची तयारी दर्शवली आहे.

(अ) २००६ – दहशतवादविरोधी लढ्यात घनिष्ट व सक्रिय सहभागासाठी करावयाच्या उपायांची चाचपणी

(ब) २०१० – रियाध घोषणापत्राद्वारे भारत आणि सौदी अरेबियाची सामरिक भागीदारी जाहीर

(क) २०१९ – संरक्षण व सामरिक क्षेत्रात सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी भारत आणि सौदी अरेबिया दरम्यान संयुक्त नौदल सराव, संरक्षण उपकरणांसाठी लागणाऱ्या सुट्या भागांचे संयुक्त उत्पादन, इंडियन ओशन रिम कंट्रीज या संघटनेच्या माध्यमातून हिंदी महासागरात सागरी सुरक्षा वाढवण्यासंबंधी उपाययोजना आदी बाबींचा समावेश असलेला करार या वर्षात करण्यात आला.

**संयुक्त अरब अमिराती (संयुक्त अरब अमिरात) :**

(अ) २००३– दोन्ही देशांदरम्यान संरक्षण सहकार्यासाठी संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. या समितीद्वारे संरक्षण क्षेत्रात सहकार्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची वेळोवेळी चर्चा केली जाते.

(ब) २००६ –भारत–संयुक्त अरब अमिराती सामरिक संवादाला संस्थात्मक स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला.

(क) २०१८–भारताच्या कर्नाटक राज्यातील पाडूर येथे खनिज तेलाचा सामरिक साठा करण्याबाबत दोन्ही देशांनी सहमती दर्शवली.

**ओमान :**

(अ) २०१८ – ओमान हा आखाती प्रदेशातील सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी वसलेला देश आहे. या देशातील बंदरात भारतीय नौदलाच्या युद्धनौका उभ्या करण्याची मुभा व त्यांना इतर सुविधा पुरवण्यासंबंधी महत्त्वाचा करार भारत आणि ओमान दरम्यान झाला.

(ब) २०१८ – ओमानने त्याचे दख्म बंदर भारताला लष्करी साहित्याची साठवणूक व पुरवठ्यासाठी वापरण्यास परवानगी देणारा करार संमत केला आहे.

**इराण :**

(अ) भारत आणि इराणने २००१ मध्ये परस्परांतील संरक्षणविषयक सहकार्य वाढवण्यासंबंधी सामंजस्य करार केला. त्यानंतर दोन्ही देशांमधील सुरक्षा संबंध क्रमाक्रमाने विकसित होत आहेत.

(ब) इराणमधील सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या चाबहार बंदराचा भारत विकास करीत आहे. तसेच, अफगाणिस्तान व मध्य आशियातील देशांना या बंदराशी जोडण्यासाठी उत्तर–दक्षिण महामार्ग विकसित करण्याचे कामही सुरू आहे. भारताच्या



चाबहार बंदर


राष्ट्रीय हितसंबंधांच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची घडामोड आहे.

**इस्राईल :**

रशियाखालोखाल इस्राईल हा भारताला संरक्षण साहित्याचा पुरवठा करणारा दुसरा मोठा देश आहे. दहशतवादविरोधी लढ्यात, दहशतवाद्यांच्या हालचालींविषयी गुप्तवार्ता संकलन करण्यात आणि संरक्षणाच्या दृष्टीने इस्राईल हा भारताचा विश्वासू साथीदार आहे. भारताला संरक्षण साहित्यातील उच्च तंत्रज्ञान देणारा हा तिसरा मोठा देश आहे. तसेच, सायबर स्पेस आणि गुप्तवार्ता संकलनातही भारताची इस्राईलशी असलेली भागीदारी महत्वाची आहे.

## पूर्व आशिया

भारताचे 'पूर्वेकडे पहा' धोरण (लूक ईस्ट पॉलिसी) १९९० च्या दशकाच्या प्रारंभी विकसित झाले. पूर्व आशिया आणि आग्नेय आशियातील देशांशी आर्थिक आणि व्यापारी संबंध विकसित करण्यावर त्याचा प्रारंभी भर होता. चीन आणि जपान या देशांशी भारताचे अनेक द्विपक्षीय करार आहेत. 'असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट एशियन नेशन्स' (ASEAN) या प्रादेशिक सहकार्य संघटनेचा भारत १९९२ मध्ये 'क्षेत्रीय संवाद भागीदार' (सेक्टोरल डायलॉग पार्शल पार्टनर) झाला आणि नंतर १९९५ मध्ये 'संपूर्ण संवाद अंशतः भागीदार' (सेक्टोरल डायलॉग पार्टनर) झाला. १९९६ मध्ये भारत आसियानच्या प्रादेशिक गटात सहभागी झाला. या संघटनेला काहीशी समांतर 'बे ऑफ बेंगॉल इनिशिएटिव्ह फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन' (BIMSTEC) ही संघटना १९९७ मध्ये स्थापन झाली. त्यात दक्षिण व आग्नेय आशियातील देशांचा समावेश आहे. तसेच, सन २००० मध्ये मेकाँग-गंगा सहकार्य परिषद स्थापन झाली. आग्नेय आशियातील देशांशी विकासाच्या मुद्द्यावर घनिष्ट संबंध प्रस्थापित करण्याचा भारताचा हा दुसरा महत्वाचा प्रयत्न होता. भारताला पूर्व आशियातील देशांशी जोडणारा ईस्ट-वेस्ट कॉरिडॉर आणि ट्रान्सएशियन हायवे असे काही प्रकल्पही भारताने संयुक्तरीत्या हाती घेतले. त्यात या प्रदेशातील सहा देशांमधील वाहतुकीच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर आहे. ट्रान्सएशियन हायवे पूर्ण झाल्यानंतर




पूर्व आशिया

तो नवी दिल्लीला कौलालंपूर, हो चि मिन्ह सिटी, नॉम पेन्ह, बँकॉक, व्हिएन्टाइन, चिआंग मै, यांगून, मंडाले, कालेम्यो, तामू, ढाक्का आणि कोलकाता आदी ठिकाणांमार्फत सिंगापूरला जोडला जाणार आहे.

इंडो-पॅसिफिक परिसरातील देशांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचे भारताचे प्रयत्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. भारत आणि जपानने त्याचे संबंध विशेष सामरिक व जागतिक संबंध या पातळीपर्यंत उंचावले आहेत. नोव्हेंबर २०१७ मध्ये फिलिपिन्सची

राजधानी मनिलात पूर्व आशिया शिखर परिषद झाली. तीत भारतासह जपान, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या देशांनी त्यांच्यातील चौहेरी सुरक्षा संवाद (क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग – QUAD) नव्याने प्रस्थापित करण्याचे ठरवले. त्यानंतर भारत आणि ऑस्ट्रेलियाने त्यांच्यातील संरक्षण संबंध विकासासाठीचा आराखडा निश्चित केला.

भारताने सन २०१४ मध्ये 'पूर्वेकडे पहा' (लूक ईस्ट) यासोबत 'पूर्वेत कृती करा' (ॲक्ट ईस्ट) असे धोरण स्वीकारले. त्यामुळे आशिया-प्रशांत विभागातील देशांशी केवळ आर्थिक, व्यापारी नव्हे तर सामरिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलण्यात आली. या धोरणामुळे इंडोनेशिया, व्हिएतनाम, मलेशिया, जपान, कोरियन प्रजासत्ताक, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर हे देश आणि आसियान या प्रादेशिक सहकार्य संघटनेशी सुरक्षा संबंध विकसित करण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे बिमस्टेक, आशिया सहकार्य संवाद (एशिया कोऑपरेशन डायलॉग – ACD), मेकाँग-गंगा सहकार्य (MGC) आणि हिंदी महासागराभोवतीच्या देशांची इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) आदी प्रादेशिक संघटनांच्या कामात भारत सक्रिय सहभाग नोंदवू लागला. 'पूर्वेत कृती करा' (ॲक्ट ईस्ट) या धोरणामुळे भारतातील अरुणाचल प्रदेशासह इतर पूर्वोत्तर राज्यांच्या विकासासाठी आशियान देशांशी व्यापार व इतर सहकार्याबाबत अनेक गोष्टी सुलभ होतील.

पूर्व आशिया विभागातील भारताचे महत्वाचे हितसंबंध पुढीलप्रमाणे सांगता येतील:

(i) **प्रादेशिक आर्थिक सुरक्षा :** पूर्व आशियात प्रादेशिक विस्तार करण्याची कोणतीही महत्वाकांक्षा भारताला नाही. मात्र, या प्रदेशातील आर्थिक व्यवहार अधिक सुरळीत व विनाअडथळा व्हावेत, अशी भारताची इच्छा आहे. त्या दृष्टीने पूर्व आशियातील अनेक देशांशी भारताने मुक्त व्यापार आणि आर्थिक सहकार्याचे अनेक करार केले आहेत.

(ii) **सुरक्षा संवाद (डिफेन्स डिप्लोमसी) :** इंडो-पॅसिफिक प्रदेशातील देशांशी सामरिक संबंधांचा विस्तार करण्याची भारताची इच्छा आहे. या प्रदेशातील शांतता आणि स्थैर्यासाठी भारतीय नौदलाचे अस्तित्व महत्वाचे आहे, असे भारताला वाटते. या प्रदेशातील भारताच्या संरक्षण धोरणात भारतीय नौदलाची महत्वाची भूमिका आहे. आग्नेय आशियातील अनेक देशांच्या बंदरांना भारताच्या युद्धनौका अनेकदा भेट देतात. सन २०१० मध्ये भारताने अंदमान व निकोबार बेटांच्या परिसरात आसियान देशांमधील नौदलांचा संयुक्त सराव आयोजित केला होता. द्विपक्षीय पातळीवर भारताने सिंगापूर आणि व्हिएतनामसमवेत संरक्षणविषयक करार केले आहेत. तसेच, जपान, चीन आणि दक्षिण कोरियाशी संरक्षण संबंधांमध्ये त्याने वाढ केली आहे.

(iii) **दक्षिण चिनी समुद्र :** हिंदी महासागर आणि प्रशांत महासागरातील महत्वाचे सागरी मार्ग खुले राहण्यासाठी दक्षिण चिनी समुद्र महत्त्वाचा आहे. यात भारताचे मोठे सामरिक हितसंबंध गुंतलेले आहेत. जपान आणि कोरियाकडून होणाऱ्या ऊर्जासाधनांच्या वाहतुकीसाठी हा मार्ग महत्वाचा आहे. तसेच, भारताची आशिया-प्रशांत विभागातील जवळपास निम्म्याहून अधिक मालवाहतूक या समुद्रातूनच होते. त्यामुळे भारताचे या समुद्रात सामरिक हितसंबंध गुंतलेले आहेत.

(iv) **पूर्वोत्तर राज्ये :** 'पूर्वेकडे पहा' आणि 'पूर्वेत कृती करा' या धोरणांमुळे भारतातील पूर्वोत्तर राज्यांच्या विकासाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. भारताची पूर्वोत्तर राज्ये भौगोलिकदृष्ट्या आग्नेय आशियातील प्रदेशांशी जोडली गेली आहेत. या राज्यांच्या विकासासाठी आग्नेय आशियातील देशांशी आर्थिक सहकार्य आणि सामाजिक-सांस्कृतिक व सुरक्षा संबंध विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

**See the following websites for additional details:**

1. Briefs of Foreign Relations, Ministry of External Affairs, Government of India. https://mea.gov.in/foreign-relations.htm
2. Annual report, Ministry of Defence, Government of India (latest available) https://mod.gov.in/sites/default/files/AR1718.pdf

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

(i) ब्रिटिश काळात ............... या देशांदरम्यान अफगाणिस्तान हे मध्यगत राष्ट्र होते.

(अ) भारत आणि इराण
(ब) भारत आणि रशिया
(क) भारत आणि तिबेट
(ड) भारत आणि पाकिस्तान

(ii) झारंज-डेलाराम मार्ग .................. मध्ये आहे.

(अ) पाकिस्तान
(ब) इराण
(क) अफगाणिस्तान
(ड) उझबेकिस्तान

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) सागरी सीमा समस्या हे भारत आणि श्रीलंकेदरम्यानच्या तणावाचे कारण आहे. कारण......

**(क) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) आसियान, बिमस्टेक, IORA, सिएटो.

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) इ.स. २००० मध्ये स्थापन केलेले मेकाँग-गंगा कार्पोरेशन (MGC) द्वारे भारताने दक्षिण पूर्व आशियाशी निकट संबंध स्थापित केले.

(ii) "स्ट्रिंग ऑफ पर्ल्स" म्हणजे चीनने दक्षिण चीन समुद्रात विकसित केलेले लष्करी-व्यापारी सुविधांचे जाळे

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) श्रीलंका व 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स'मधील हम्बनटोटा बंदर

**प्र. ४ आपले मत नोंदवा.**

(i) भारत अफगाणिस्तानात बरेच विकासकार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हे भारताला लाभदायी कसे ठरते ?

**प्र. ५ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) विस्तारित सरहद्द म्हणजे काय ? भारताशी त्याचा संबंध काय ?

**उपक्रम**

वृत्तपत्रे, मासिके इत्यादींद्वारे पश्चिम आशियातील (अरब देश, इराण, तुर्कस्तान आणि इस्त्रायल) घटनाक्रमांची माहिती जमा करा. त्याआधारे वर्गात सादरीकरण करा.